# घटक ⇒ १. ऐतिहासिक पार्श्वभूमी

⇒ इ.स.१६०० ⇒ भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा प्रवेश - सुरुवातीस व्यापारी कामकाज -
⇒ इ.स.१७६५ ⇒ बंगाल, बिहार व ओरीसा - दिवाणी अधिकार (महसूल व दिवाणी न्यायाचा)
⇒ इ.स.१८५८ ⇒ भारतीय शासनाची थेट जबाबदारी ब्रिटिश राजघराण्याकडे

टप्पे ⇒ ① कंपनीची राजवट ⇒ (१७७३-१८५८)

## ① रेग्युलेटींग अॅक्ट, १७७३ (नियामक कायदा)

* कंपनीच्या भारतातील कामकाजाचे नियंत्रण व नियमन :
* कंपनीच्या राजकीय व प्रशासकीय कार्यांना मान्यता.
* भारतातील केंद्रिय प्रशासनाचा पाया.

वैशिष्ट्ये ⇒ * बंगालचा गव्हर्नर → गव्हर्नर जनरल बनला - } वॉरन हेस्टिंग्ज पहिला ग.ज.
त्याच्या सहाय्यासाठी ४ सदस्याचे कार्यकारी मंडळ.

* मुंबई व मद्रासचे गव्हर्नर ग.ज.ला दुय्यम बनले पूर्वी स्वतंत्र.
* कोलकाता येथे मुख्य न्यायमूर्ती व ३ सदस्य असलेले सर्वोच्च न्यायालय (१७७४) स्थापन (कलकत्ता येथे मेयर कोर्टच्या जागी हे कोर्ट स्थापन करण्यात आले. ते फोर्ट विल्यम या ठिकाणी स्थापन झाले. १८६२ साली कलकत्ता उच्च न्यायालयाची स्थापना होण्यापूर्वीचे सर्वात मोठे न्यायालय होते. १७७४ ते १७८२ पर्यंत - बंगाल, बिहार, ओरिसा प्रांतातील कोणताही व्यक्ती या न्यायालयाच्या न्यायकक्षेत येत होता. मात्र १७८१ चा कायदा नुसार १७८२ पासून कलकत्त्या मध्ये राहणारे सर्व व बंगाल, बिहार, ओरिसामधील फक्त ब्रिटिश व्यक्ती न्यायकक्षेत आले.)

## ② पिट्सचा इंडिया अॅक्ट : १७८४

* तत्कालीन पंतप्रधान विल्यम पिटयाने पार्लमेंटपुढे मांडला.

वैशिष्ट्ये : * कंपनीच्या व्यापारी व राजकीय कार्यात भेद

* दुहेरी शासनपद्धती : i) संचालक मंडळ — व्यापारी कारभार (BOD)
ii) नियामक मंडळ — राजकीय कारभार (BOC)
(नागरी, लष्करी, शासनविषयक, महसूलविषयक)
* या कायद्यान्वये कंपनीच्या क्षेत्राला ब्रिटिशांच्या ताब्यातील क्षेत्र असे संबोधले जाऊ लागले

## ③ सनदी कायदा १८३३ - (चार्टर अॅक्ट १८३३)

ब्रिटिश भारतातील केंद्रिकरणाच्या दृष्टीने अंतिम टप्पा.

वैशिष्ट्ये * बंगालचा ग.ज. भारताचा ग.ज. बनला - सर्व नागरी व सैनिकी अधिकार दिले.
लॉर्ड विल्यम बेंटिक हा भारताचा पहिला ग.ज. बनला.

Scanned by CamScanner

* मुंबई व मद्रास ग.ज.चे कायदे करण्याचे अधिकार काढून घेतले.
* पूर्वीच्या कायद्यांच्या नियमांना Regulation - नियम म्हणण्यात आले.
  या — " — Act - कायदे — " —
* कंपनीची व्यापारी संस्था म्हणून असलेले अस्तित्व संपुष्टात. ती प्रशासनिक संस्था राहिली.
* नागरी सेवकांच्या निवडीसाठी मुक्त स्पर्धात्मक पद्धती आणण्याचा प्रयत्न.

## ④ सनदी कायदा १८५३

१७७३ पासून दर २० वर्षांनी संमत होणाऱ्या सनदी कायद्यांच्या मालिकेतील शेवटच्या.

वैशिष्ट्ये

* प्रथमच ग.ज.च्या कौन्सिलची कायदेविषयक कार्ये व कार्यकारी कार्य यात भेद केला - लेजिस्लेटिव्ह कौन्सिल म्हणून ६ नव्या सदस्यांचा कौन्सिल मध्ये समावेश. म्हणजेच ६ सदस्यांचे विधीमंडळ तयार झाले.
* नागरी सेवामध्ये भरतीसाठी व निवडीसाठी खुली स्पर्धा पद्धती सुरु करण्यात आली (त्यासाठी १८५४ मध्ये मेकॉले समितीची नियुक्ती)
* पहिल्यांदाच भारतीय विधीमंडळात स्थानिक प्रतिनिधीत्व → नव्या सहा सदस्यांपैकी चार सदस्य मद्रास, मुंबई, बंगाल व आग्रा येथील प्रांतिक सरकारे नियुक्त करतील

## ⑤ भारत सरकार कायदा १८५८

वैशिष्ट्ये

* कंपनीची सत्ता संपुष्टात, — अधिकार ब्रिटिश राजघराण्याकडे - सरकार — राणीच्या नावाने — राणीद्वारे चालवण्यात येईल
* व्हाईसरॉय ब्रिटिश राजघराण्यातील भारतातील थेट प्रतिनिधी (ग.ज.पद रद्द) लॉर्ड कॅनिंग हा पहिला व्हाईसरॉय
* संचालक मंडळ व नियामक मंडळ रद्द - दुहेरी शासनपद्धती रद्द
* भारतीय प्रशासनावर नियंत्रणासाठी ब्रिटिश मंत्रिमंडळात भारतमंत्री हे पद निर्माण केले त्याच्या कामात मदत करण्यासाठी (१५) सदस्य असलेले इंडिया कौन्सिल (भारत मंडळ) स्वरूप सल्लागारी - कौन्सिलचा अध्यक्ष — भारतमंत्री - इंडिया कौन्सिल भारतात व भारताबाहेर इतरावर खटला भरू शकत होती आणि तिच्यावरही खटला भरला जावू शकत होता.

## ⑥ इंडिया कौन्सिल्स ॲक्ट : १८६१

वैशिष्ट्ये :

* विस्तारित कौन्सिलमध्ये भारतीयांना अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशन
* कॅनिंगने १८६२ मध्ये बनारसचा राजा, पतियाळाचे महाराज, सर दिनकरराव.
* मुंबई व मद्रास प्रांतांना कायदे करण्याचे अधिकार = विकेंद्रिकरणाची प्रक्रिया.
* बंगाल, वायव्य सरहद्द प्रांत, व पंजाब यांच्यासाठी नवीन कायदेमंडळ स्थापन करण्याची तरतूद

Scanned by CamScanner

त्यानुसार. १८६२ ⇒ बंगाल, १८६६ ⇒ वायव्य सरहद्द प्रांत व १८७०- पंजाब - कायदेमंडळ

टाटिलो.

* १८५९ मध्ये लॉर्ड कॅनिंगने सुरू केलेल्या खाते निहाय पद्धतीला या कायद्यान्वये मान्यता.

* आणिबाणीच्या काळात अधिसूचना काढण्याचे अधिकार व्हाईसरॉयला.

## ) इंडिया कौन्सिल ॲक्ट १८९२

वैशिष्ट्ये = * केंद्रिय व प्रांतिक कायदेमंडळातील सदस्य संख्या वाढवली.

* कायदेमंडळाची कार्ये विस्तारण्यात आली - अर्थसंकल्पावर चर्चा करणे.
कार्यकारी विभागाला प्रश्न विचारण्याचे अधिकार देण्यात आले.

* प्रांतिक कायदेमंडळात अशासकीय सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद.

## ⑧ इंडिया कौन्सिल ॲक्ट १९०९.

मोर्ले मिंटो सुधारणा कायदा: (मोर्ले - भारतमंत्री व मिंटो - व्हाईसरॉय)

वैशिष्ट्ये → * केंद्रिय व प्रांतिक कायदेमंडळाचा आकार वाढविण्यात आला.
सदस्य संख्या १६ वरून ६० वर
प्रांतिक - समान नव्हती.

* केंद्रिय → सरकारी सदस्यांचे बहुमत * प्रांतिक - बिनसरकारी सदस्यांच्या बहुमताला अनुमती.

* पहिल्यांदाच भारतीयांना व्हाईसरॉय व गव्हर्नर यांच्या कार्यकारी मंडळात सहभागी करण्याची तरतूद ⇒ सत्येंद्र प्रसाद सिन्हा कार्यकारी मंडळात - पहिले भारतीय.

* स्वतंत्र मतदारसंघ ही संकल्पना: मुस्लिमांना धर्माच्या आधारित प्रतिनिधीत्व सांप्रदायिकतेला कायदेशीर स्वरूप मिळाले.

## ⑨ भारत सरकार कायदा १९१९ - मॉटेग्यू चेम्सफर्ड कायदा:

२० ऑ. १९१७ - भारतात टप्प्याटप्प्याने जबाबदार शासन स्थापन करण्याचे उद्दिष्ट असल्याचे ब्रिटिश सरकारने घोषित केले.

त्यानुसार १९१९ चा कायदा पारित व अमलात १९२१

वैशिष्ट्ये : * केंद्रिय व प्रांतिक विषय वेगळे करून केंद्राचे प्रांतावरील नियंत्रण ढिले केले.

* प्रांतिक विषयांचे 'सोपीव खाती' व 'राखीव खाती' असे दोन भाग.

* मंत्री - सोपीव विषयांचे प्रशासन } द्विदल राज्यपद्धती
* गा.ज.व कार्यकारी मंडळ ⇒ राखीव विषयांचे प्रशासन.

* केंद्रात प्रथमच द्विगृही कायदेमंडळ - कॉन्सिल ऑफ स्टेट्स - वरिष्ठ
सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्ली - कनिष्ठ

* व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात ६ सदस्यांपैकी तीन सदस्य भारतीय.

* शीख, भारतीय ख्रिश्चन, ॲंग्लो इंडियन व युरोपियन ⇒ स्वतंत्र मतदार संघ.

* मालमत्ता कर व शिक्षण या आधारावर मर्यादित लोकांना मताधिकार.

Scanned by CamScanner

* संसदमध्ये भारताचा उच्चायुक्त असे नवीन पद.
* लोकसेवा आयोग स्थापन करण्याची तरतूद - त्यासाठी १९२३-२४ मध्ये ली कमिशन
च्या शिफारशी → १९२६ मध्ये स्थापना.
* प्रांताचे अर्थसंकल्प केंद्रिय अर्थसंकल्पापासून वेगळे - प्रांतिक विधिमंडळांना अधिकार
* कायद्याची अंमलबजावणी कशी होते यासाठी १० वर्षांनी वैधानिक आयोग नियुक्तीची तरतूद.

## (10) सायमन कमिशन : १९२७

१९२७ - सर जॉन सायमन - सात सदस्यीय वैधानिक आयोग (सर्व ब्रिटिश)

अहवाल - १९३०

* दुहेरी शासनव्यवस्था रद्द करावी.
* ब्रिटिश भारत आणि संस्थाने यांचे संघराज्य स्थापन करावे.
* सांप्रदायिक मतदारसंघ पद्धती पुढे चालू ठेवावी.

आयोगाच्या शिफारशीवर विचार विनिमय करण्यासाठी ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी, ब्रिटिश भारताचे प्रतिनिधी, आणि संस्थानांचे प्रतिनिधी यांच्या ३ गोलमेज परिषदा आयोजित केल्या.

## (11) जातीय निवाडा - १९३२

ऑगस्ट १९३२ - तत्कालिन पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी - सांप्रदायिक मतदारसंघाची योजना दलित वर्गालाही लागू केली.

गांधीजींचे या विरोधात - पुणे येथील येरवडा तुरुंगात आमरण उपोषण

गांधीजी व आंबेडकर यांच्यात करार - पुणे करार त्यानुसार

हिंदूंचे संयुक्त मतदारसंघ असतील व दलित वर्गाला राखीव जागा.

## (12) भारत सरकार कायदा १९३५

उत्तरदायी सरकार स्थापन्याच्या वाटचालीतील हा दुसरा टप्पा.

कलमे - ३२१ व १० परिशिष्टे.

वैशिष्ट्ये :

* प्रांत आणि संस्थाने मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन करण्याची तरतूद.
(संघ सूची ५९ विषय, प्रांत सूची ५४, समवर्ती सूची ३६ विषय)
शेषाधिकार - व्हाईसरॉय. (संस्थाने सहभागी न झाल्याने संघराज्य अस्तित्वात आले नाही)
* प्रांतांमधील दुहेरी शासनव्यवस्था रद्द = उत्तरदायी सरकार पद्धती - १९३७ - रद्द १९३५मध्ये
* केंद्रात दुहेरी शासनव्यवस्था - राखीव व सोपीव - प्रत्यक्षात अंमलात आली नाही.
* अकरापैकी सहा प्रांतात द्विगृही कायदेमंडळ (बंगाल, बॉम्बे, मद्रास, बिहार, आसाम, संयुक्त प्रांत)
* दलित वर्ग, महिला व कामगारांसाठी - स्वतंत्र मतदारसंघ.
* भारतमंत्र्याची इंडिया कॉन्सिल रद्द.
* मताधिकारात वाढ - लोकसंख्येच्या १०% लोकांना मताधिकार.
* RBI ची स्थापन करण्याची तरतूद.
* संघराज्यीय न्यायालय स्थापन करण्याची तरतूद - १९३७मध्ये फेडरल कोर्टची स्थापना.

Scanned by CamScanner

# भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा : १९४७

⇒ २० फेब्रु १९४७ ⇒ ३० जून १९४८ पर्यंत भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात येईल आणि त्यानंतर सत्ता जबाबदार भारतीयांकडे सोपविली जाईल - पंतप्रधान क्लेमंट ॲटली.

⇒ मुस्लिम लीगचे फाळणीसाठी आंदोलन.

⇒ ३ जून १९४७ - माऊंटबॅटन - याने फाळणीची योजना सादर केली.

⇒ काँग्रेस व लीग दोघांना मान्य.

वैशिष्ट्ये =

* ब्रिटिश राजवट संपुष्टात.
* फाळणी — भारत व पाकिस्तान दोन स्वतंत्र राष्ट्रे.
* व्हाईसरॉय पद रद्द - ग. जनरल नियुक्त.
* भारत व पाक सरकारसाठी ब्रिटन मधील सरकार उत्तरदायी राहणार नाही.
* राज्यघटना तयार करून स्विकारण्याचे अधिकार संविधान सभांना.
* ब्रिटिश संसदेने केलेला कोणताही कायदा रद्द करण्याचे अधिकारही सभांना.
* संस्थानावरील व आदिवासी क्षेत्राबाबत करारानुसार असलेले संबंध रद्द.
* संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याची किंवा स्वतंत्र राहण्याची मुभा.
* राज्यघटना तयार होईपर्यंत राज्यव्यवस्था १९३५ च्या कायद्यानुसार.
* नकाराधिकार किंवा विधेयके राखून ठेवण्याचा ब्रिटन सम्राटाचा अधिकार संपुष्टात. तो अधिकार ग. जनरलला.

लॉर्ड माऊंटबॅटन हा नव्या स्वतंत्र भारताचा पहिला ग. ज. बनला - १९४६ साली स्थापन झालेली भारताची संविधान सभा भारताची संसद बनली.

| क्र. | खाते | अंतरिम सरकार १९४६ | स्वतंत्र भारताचे पहिले मंत्रिमंडळ १९४७ |
|---|---|---|---|
| १ | पंतप्रधान | — | जवाहरलाल नेहरू |
| २. | परराष्ट्र व्यवहार, राष्ट्रकुल संबंध. | जवाहरलाल नेहरू | —॥— |
| ३. | गृह, माहिती, नभोवाणी | सरदार पटेल. | सरदार पटेल. |
| ४. | अन्न व कृषी | राजेंद्र प्रसाद | राजेंद्र प्रसाद |
| ५ | रेल्वे व वाहतूक | असफ अली | जॉन मथाई. |
| ६. | संरक्षण | सरदार बलदेव सिंग | सरदार बलदेव सिंग. |
| ७. | वित्त | लियाकत अली खान | आर. के. षण्मुखम चेट्टी. |
| ८. | उद्योग व पुरवठा | जॉन मथाई | श्यामा प्रसाद मुखर्जी |
| ९. | कायदा. | जोगिंदर नाथ मंडल | बी. आर. आंबेडकर. |
| १०. | शिक्षण | सी. राजगोपालाचारी | मौलाना आझाद |
| ११. | श्रम | जगजीवन राम | जगजीवन राम. |
| १२ | बांधकाम खाणी ऊर्जा | सी. एच. भाभा | व्ही. एन. गाडगीळ. |

Scanned by CamScanner